# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक २०-०८-२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दि.२० ऑगस्ट २००८ (दि.१९-२९/०७/२००८ रोजीची तहकूब सभा) का.प.क्र.१३ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी १२-०७ वा.वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,श्री.दिलीप बंड,नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०२. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०३. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
०४. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०५. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलीक
०७. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०८. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०९. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१०. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
११. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१२. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१३. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१४. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१७. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१८. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१९. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२२. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२३. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२४. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२५. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२६. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अब्दुल कदीर
३०. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३१. स.स.श्री.स.खुसरो स.बुऱ्हानोद्दीन

३२. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३३. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३४. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३५. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन खान
३६. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३७. स.स.श्री.खान निसार मोहंमद खान
३८. स.स.श्री.हाजी शेरखान अब्दुल रहेमान
३९. स.स.सौ.राऊत छाया विलास
४०. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४२. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिनसईद
४३. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफीज
४४. स.स.श्री.पटेल सलीम समशेर पटेल
४५. स.स.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे
४६. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४७. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४८. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४९. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५०. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५१. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५३. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५४. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५५. स.स.डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५६. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५७. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५८. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५९. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६०. स.स.सौ.ससाणे सरिता अशोक
६१. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६२. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६३. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६४. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६५. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६६. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६७. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७१. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७२. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७३. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
७४. स.स.सौ.जैन अल्पा विकास

७५. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७६. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७७. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) गुलाबचंद व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**संवाद :**

श्री.काशिनाथ कोकाटे :मा.उप महापौर यांचे चिरंजीव स्व.संजय भाऊसाहेब वाघ यांचे दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

डॉ.भागवत कराड :
श्री.संतोष जेजूरकर :
श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय
} यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजलीसाठी २ मिनीटे स्तब्ध उभे रहावे.
याच वेळी स्व.संजय भाउसाहेब वाघ यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.सलीम खान :अनेक समस्या निर्माण झालेल्या आहे चर्चेसाठी वेळ देणार आहे का ?

मा.महापौर :ही तहकूब सभा आहे दुपारी रेग्यूलर सभा आहे त्यावेळी चर्चेसाठी वेळ देण्यात येईल.

श्री.मो.जावेद मो.इसाक:चार वेळेस ही सभा तहकूब झाली. शहराच्या विकासाच्या संदर्भात चर्चा करता आली नाही. अगोदर चर्चा करावी त्यानंतर विषयाला सुरूवात करावी.

श्री.संतोष जेजूरकर :शहराला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत होता. त्याकरीता समांतर जलवाहिनीसाठी मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे यांनी केंद्र शासनाकडून २८८ कोटी रूपये मंजूर करून घेतले याच बरोबर केंद्रातील राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते मा.श्री.शरदचंद्रजी पवार मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य तसेच मा.ना.श्री.जयपाल रेड्डी साहेब मा.श्री.गोपीनाथजी मुंढे या सर्वांनी यासाठी सहकार्य केले त्याबद्दल सभागृहाच्या वतीने या सर्वांचा अभिनंदन ठराव पास करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :खरोखरच निधी मंजूर झाला आहे का प्रशासनाकडून माहिती घ्यावी व त्यानंतर चांगली चर्चा करून अभिनंदनाचा ठरावास मान्यता द्यावी.

श्री.संजय जोशी :आदरणीय खैरे साहेबांचे पत्र आलेले आहे. केंद्र शासनाकडून या संदर्भात प्रशासनाकडे काही माहिती प्राप्त झाली आहे का याचा ही खूलासा होणे गरजेचे आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:यापूर्वी चर्चा झाली आहे फक्त अभिनंदन करायचे आहे. हा निधी मंजूर करण्यासाठी ज्या-ज्या लोकप्रतिनिधी यांनी सहकार्य केले त्या सर्वांचे अभिनंदन करावे विषय पत्रिकेवर प्रस्ताव आहे प्रस्ताव घेतांना त्यावेळी चर्चा करून खुलासा घेणे संयुक्तीक होईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे अभिनंदन करतो या सभागृहाची प्रथा आहे. परंतू जे पत्र आले ते मा.मुख्यमंत्री यांचे रिकमन्डेशन वरून पत्र

आलेले आहे. त्या पत्रातील ज्या कन्टेन्ट्स बघीतले तर ज्या स्कीममध्ये प्रकरण दाखल केले आहे ती स्कीम तत्वता मान्य होते. याचा अर्थ असा नव्हे की २८८ कोटी महापालिकेला दिले असा अर्थ गृहीत धरणे चुकीचे आहे. प्रशासनाने या बाबतीत सविस्तर खुलासा द्यावा.

मा.महापौर :विषय पत्रिकेवर हा विषय आहे त्यावेळी त्यावर चर्चा करावी.

श्री.अ.रशिद खान :शहराला प्रथम पुरेसे पाणी दयावे नंतर अभिनंदन करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :जनतेसाठी विकासाची कामे होण्यासाठी ही सभा आपण घेता गेल्या आठ महिण्यात पाहिजे तेवढी विकास कामे झाली नाही. गेल्या तीन महिण्यापासून या सभागृहात विकास कामाच्या संदर्भात चर्चा झाली नाही. सिडको हडको व नवीन वसाहतीमधून अनेक मोठया प्रमाणात टॅक्स वसूल झाला असतांना त्या भागात विकास कामे बंद आहे. अर्थसंकल्पात जी कामे दाखविलेली आहेत ती कामे व्हावीत. सिडको,हडको नवीन वसाहत,नव्याने कर आकारणी झाली मात्र विकास कामे ठप्प झालेले आहे. नियमित सभेत यावर चर्चा होईलच.

मा.महापौर :आपल्या मताशी मी सहमत आहे. या संपूर्ण विषयाची चर्चा दुपारच्या रेग्युलर बैठकीमध्ये करता येईल. आता विषयपत्रिकेला सुरूवात करण्यात येते.

**विषय क्र. २६१ :**

दिनांक २१.०४.२००८ (दि.३१.०३.०८ ची तहकूब सभा),दि.१७.०५.२००८ (दि.१९.०४.२००८ ची तहकूब सभा) व दि.१७.०५.२००८ (का.प.क्र.१०) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**चर्चा :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:एकदम सर्वच सभांचे इतिवृत्त दिले जाते चार ते पाच विषय पत्रिका एकदम दिली जाते. एकाच वेळी न देता वेळोवेळी मागिल सभेचे इतिवृत्त पूढील आयोजित केलेल्या सभेच्या वेळी देत रहावे.एकत्रित विषय पत्रिका द्यावी.

श्री.संतोष जेजूरकर :दिनांक १७-५-२००८ च्या इतिवृत्तातील ठराव क्र. २३३ मध्ये श्री.खा.बी.अरब यांना दोन वर्षासाठी प्रतिनियुक्तीचा कालावधी दिला आहे. प्रत्येक वेळी सर्वच अधिका-यांना एक वर्षासाठी दिले जाते त्यांनाही एक वर्षाचा करावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :आपण दर वेळेस १-१ वर्ष म्हणून देतो. आता मान्य करण्यास हरकत नाही. सर्वांचे २ वर्ष करावे.

डॉ.भागवत कराड :इतिवृत्त कायम करणार आहोत. काही अधिका-यांना प्रतिनियुक्ती एक वर्षासाठीद तर काहींची दोन वर्षासाठी दयावी असा प्रशासनाचे ठराव आहेत. आतापर्यत जे ठराव आले ते एक वर्षासाठीचेच आले यांचेही एक वर्षासाठी करावे. सर्वच अधिकाऱ्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा ठेवावा.

मा.महापौर :तशी दुरूस्ती करण्यात येते.

श्री.अ.रशिद खान :मागिल बैठकीत २ वर्षासाठी मंजूरी दिलेली आहे.

मा.महापौर :प्रत्येक वेळी प्रशासनाकडून एकच वर्षाकरीता प्रस्ताव येतो हा प्रस्ताव प्रशासनाकडून दोन वर्षाकरीता प्रतिनियुक्तीचा होता. असे प्रस्ताव प्रशासनाने ऐनवेळी न देता अगोदर दिले पाहिजे. सर्वांना एकच नियम एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीस मान्यता देण्यात येते.

याच वेळी मा.महापौर डायस समोर मोठमोठमोठयाने स.सदस्यांचे बोलणे चालू असते.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. एका वेळेस एकाच सदस्यांनी बोलावे.

श्री.त्र्यंबक तुपे :संबधीत अधिकारी महापालिकेच्या नियमानुसार त्या पदावर राहू शकतात का?

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी या संदर्भात खुलासा करावा.

मा.आयुक्त :शासनाकडून येणारे अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेतले जाते ते समकक्षेतील जी वेतनश्रेणीत आहे त्या प्रमाणे असेल तर रूजू करून घेतो. कक्ष अधिकारी येथे उपआयुक्त म्हणून घेतलेले आहे जनरली अशीच पध्दत होते की डेप्युटेशनवरील जो कुणी अधिकारी येईल त्यांना सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने रूजू करून घेतले जाते. व सुरूवातीला एक वर्षाचा कालावधी दिला जातो. एक वर्षाच्या कालावधीनंतर सदर अधिकारी महापालिकेसाठी योग्य आहे असे वाटले तर एक वर्षा ऐवजी पुढील दोन वर्षाचा कालावधी देवू शकतो प्रशासनाने दोन वर्षाचा प्रस्ताव दिला होता तो एक वर्षाचा समजण्यात यावा.

मा.महापौर :एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीचा कालावधी देण्यात येतो. इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

दिनांक १७.०५.२००८ रोजीच्या इतिवृत्तातील विषय क्र.२३३ मध्ये करमुल्य निर्धारक व संकलक श्री.खा.बी.अरब यांची प्रतिनियुक्ती २ वर्षा ऐवजी १ वर्ष करण्याच्या दुरूस्तीसह दिनांक २१.०४.२००८ (दि.३१.०३.०८ ची तहकूब सभा), दि.१७.०५.२००८ (दि.१९.०४.२००८ ची तहकूब सभा) व दि.१७.०५.२००८ (का.प.क्र.१०) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. २६२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश क्र.टीआरएफ-१०/२००७/प्र.क्र.९२/ई-१, मंत्रालय, मुंबई-३२ दि.१२/७/२००७ नुसार श्री.यु.आर.घुगे, विशेष भूसंपादन अधिकारी (जा.प्र.-१), औरंगाबाद यांची उपआयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात आली होती.

त्याप्रमाणे श्री.यु.आर.घुगे,यांना उपआयुक्त (महसूल) या पदावर दि.१७/७/२००७ पासून मध्यान्हानंतर रूजू करून घेण्यात आले. दि.२/८/२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.९६५/२ नुसार दि.१७/७/२००७ पासून एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसाठी ठराव मंजुर केलेला आहे. सदर प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.१६/७/२००८ रोजी संपत असल्यामुळे व महापालिकेला त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांचा प्रतिनियुक्ती कालावधी दि.१७/७/२००८ पासून पुढील एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता व्हावी.

मा.महापौर : मंजुर करण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,श्री.यु.आर.घुगे, उप आयुक्त (महसुल) यांना विषय क्र.९६५/२ नुसार दिनांक १७.०७.२००७ पासून एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसाठी ठराव मंजुर झाला होता. सदर प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक १६.०७.२००८ रोजी संपत असल्यामुळे व महापालिकेला त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांचा प्रतिनियुक्ती कालावधी दिनांक १७.०७.२००८ पासून पुढील १ वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नुसार प्रतिनियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे आदेश क्र. बदली-१०.०८/प्र.क्र.२२/२००८/कोषा.(प्र.२) दि.३१/५/२००८ नुसार श्री.वि.सो.जाधव सहाय्यक संचालक (प्रशिक्षण),उपसंचालक लेखा कोषागारे,औरंगाबाद यांची मुख्य लेखा परिक्षक,महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रशासकीय कारणास्तव प्रतिनियुक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यात आली आहे.

करीता श्री.वि.सो.जाधव,यांची रूजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.५/६/२००८ रोजी मध्यान्हपूर्व मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : १ वर्षासाठी मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,श्री.वि.सो.जाधव,मुख्यलेखा परिक्षक औरंगाबाद महानगरपालिकेत दिनांक ०५.०६.२००८ रोजी मध्यान्हपूर्व मुख्य लेखा परिक्षक महानगरपालिका औरंगाबाद या पदावर रूजु झाले असून ते रूजू झाल्यापासून प्रस्तावीत केल्याप्रमाणे प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीस प्रथम १ वर्षासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महाराष्ट्र शासन कृषि,पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे आदेश क्र.पसंप्र-११०८/प्र.क्र.१५०/०८/पदुम-१ दि.३१/५/२००८ अन्वये डॉ.बी.एस.नाईकवाडे,पशुधन विकास अधिकारी,पशुवधगृह,जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, औरंगाबाद यांची मुख्य पशुसंवर्धन अधिकारी,महानगरपालिका औरंगाबाद या पदवर प्रतिनियुक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यात आली आहे.

करीता डॉ.बी.एस.नाईकवाडे,यांची रूजूझाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.१०/६/२००८ रोजी मध्यान्हपूर्व मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम एकवर्षा करीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : १ वर्षासाठी मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बी.एस.नाईकवाडे, हे औरंगाबाद महानगरपालिकेत दिनांक १०.०६.२००८ रोजी मध्यान्हपूर्व मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर रूजू झाले असून, ते रूजू झाल्याच्या दिनांका पासून प्रथमत: १ वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला जिन्सी येथील सीटीएस क्र.९२३८/१ पैकी ९६४.८० चौ.मी.जागा म.न.पा. ने रितसर संपादीत केलेली असून सदर जागा ही म.न.पा.च्या ताब्यात आहे. उक्त जागा ही मंजुर विकास योजनेनुसार शाळेसाठी आरक्षित आहे.

जिन्सी येथील सध्या अस्तित्वात असलेली म.न.पा.प्रा.शा.विकास योजनेमध्ये बाधीत आहे. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २००८-०९ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई याच्याकडून उपलब्ध होणाऱ्या निधीतून उक्त शाळेसाठी आरक्षित जागेवर नवीन शालेय इमारत बांधण्याचा प्रस्ताव असून सद्यस्थितीत सदरील जागेवर अस्तित्वात असलेली १० जुनी दुकाने तोडावी लागणार आहेत.

करीता मोहल्ला जिन्सी येथील सीटीएस क्र.९२३३/१ पैकी ९६४.८० चौ.मी.शाळेसाठी आरक्षित जागेवर सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शालेय इमारत बांधण्याचा प्रस्ताव तसेच उक्त जागेवर

सध्या अस्तित्वात असलेली १० जुनी दुकाने तोडण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

श्री.संतोष जेजूरकर : प्रशासनाकडून माहिती घ्यावी.

श्री.सतीष कटकटे : शिक्षण समितीच्या मार्फत हा विषय यायला पाहिजे.जागेची पाहणी वगैरे करून या सभागृहासमोर यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:शाळेसाठी आरक्षीत जागा आहे.तेथे दुकाने आहे ते तोडण्यासाठी प्रस्ताव आलेला आहे. पैसे दयायचे नाही. मंजूर करण्यास हरकत नसावी.

मा.महापौर :असे जेव्हा विषय येतात ते त्या त्या समितीच्या मार्फत यायला पाहिजे जेणे करून व्यवस्थित चर्चा होते यापूढे असे जे विषय समितीचे संदर्भात आहेत ते विषय डायरेक्ट प्रस्ताव या सभागृहात येवू नये काळजी घ्यावी फक्त शिक्षण समिती नव्हे तर इतर सर्व विषय समितीच्या अधिकारात असलेले प्रस्ताव त्यांची शिफारस करून पाठविले पाहिजे. हा विषय मंजूर करण्यात येतो. पुढचे सर्व प्रस्ताव विषय समिती मार्फत पाठवावे.

श्री.सतीष कटकटे :प्रस्ताव आयुक्त की शिक्षणाधिकारी कुणी ठेवला.

श्री.गजानन बारवाल :सर्व शिक्षा अभियान अंतर्गत महापालिकेला किती निधी प्राप्त झाला आहे.माहिती दयावी.

श्री.दिलीप गायकवाड :जे अतिक्रमण काढले जात आहे ते योग्य नाही.

मा.महापौर :दुपारी रेग्यूलर सभा आहे त्यात चर्चा केली जाईल. विषय क्र.२६५ मंजुर केला आहे तत्पुर्वी शिक्षणाधिकारी यांनी या प्रस्तावा विषयी माहिती द्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :यापूढे ज्या त्या समितीच्या संबधीत विषय असेल त्या समितीच्या मार्फत येणार आहे काय?तीन वर्षात कोणते ठराव समितीच्या मार्फत आले. जो आलेला आहे तो महापालिकेचाच आहे.

मा.महापौर :हा धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे. ही जागा विकास योजनेत बाधीत आहे

श्री.गजानन बारवाल :त्या त्या विषय समितीचे अधिकार त्यांनाच वापरू दयावे. त्यांचे मार्फत यायला पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रस्ताव कुणी ठेवला झालेल्या दुकाने केंव्हा व कुणी बांधली होती माहिती दयावी.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी माहिती दयावी.

कार्य.अभियंता इ.(बांध.) :सर्वसाधारण सभेत मा.आयुक्तांच्या मंजुरीनेच प्रस्ताव ठेवले जातात. जिन्सी पाण्याची टाकी जवळील कृषी उत्पन्न बाजार समितीची जागा होती ती महापालिकेकडे हस्तांतरीत झाली आहे तेथे काही दुकाने बांधलेली आहे त्याच जागेवर शाळेसाठी आरक्षण टाकलेले आहे शाळा इमारत करायची असेल तर दुकाने काढणे आवश्यक आहे महानगरपालिकेच्या मालमत्तेची विल्हेवाट लावायची असल्यास सर्वसाधारण सभेची मान्यता लागते त्यामूळे या विभागाकडून प्रस्ताव ठेवला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : शाळेसाठी जागा आरक्षीत होती तर दुकाने कशी बांधली कुणी बांधली याचा खूलासा होणे आवश्यक आहे.

श्री.गजानन बारवाल :दुकाने महापालिकेच्या वापरात येत असेल व भाडे येत असेल तर बाजूला जागा उपलब्ध असेल तर त्या ठिकाणी शाळेची इमारत बांधावी. तोडायची गरज नाही.

श्री.भगवान घडमोडे :दुकाने केव्हा बांधली जागा कुणाची होती.आरक्षण कोणत्या वर्षी टाकले गेले याचा खुलासा घ्यावा.

श्री.अशरफ मोतीवाला :९६५ स्क्वे. मी जागा आहे. या भागात २ शाळा आहेत. ती डी.पी प्लॅन नुसार इफेक्टेड आहे.केंव्हातरी तोडावे लागणार आहे तेथे दोन शाळा सध्या चालू आहे. ६ वर्ग सध्या आहे ५००-६०० विदयार्थी सध्या शिक्षण घेतात त्यामूळे खुप अडचण येते. अपघात होतात शाळेचे काम करावे लागणार आहे प्रस्ताव मान्य करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :महापालिकेची जिन्सीमध्ये समोरील चौकात ही शाळा असून ६ खोल्या तेथे आहे. राजाबाजार गणपती ते सिडको कडे जाणारा रस्त्यात दोन खोल्या व चम्पा चौकते सेन्टफ्रान्सिसला जाणा-या रस्त्यात दोन खोल्याची जागा बांधीत होते. त्यामूळे दोन खोल्या राहतात. बाजुची जागा कृषी उत्पन्न बाजार समितीची होती ती महापालिकेचे विकत घेतली असून शाळा व उद्यानसाठी आरक्षीत आहे. ५००-६०० विदयार्थी मराठी-उर्दु माध्यमाचे आहेत. त्या शाळेत असून तेथे दोन वर्षापूर्वी शाळेची पाहणी सुध्दा केली होती

श्री.रेणुकादास वैद्य :शाळेसाठी आरक्षीत जागा असतांना १० दुकाने कुणी बांधली कमर्शियल वापरासाठी मान्यता कुणी दिली.विदयार्थ्यांची अडचण होते समजू शकतो परंतू माहिती न मिळता मान्यता देणे योग्य वाटत नाही. अधिकाऱ्यापेक्षा स.सदस्याकडेच जास्त माहिती.

श्री.अशरफ मोतीवाला :३० वर्षापूर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीने दुकाने बांधलेली आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :जागा पाहणी केली तर असे दिसते की, सदर दुकाने कृषी उत्पन्न बाजार समितीने बांधलेली असावीत.

श्री.भगवान घडमोडे :शिक्षणाची बाब असल्याने कुणी विरोध करणार नाही. डी.पी प्लॅन केंव्हा केला दुकाने कुणी बांधली. सर्व माहिती समोर यावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :आज आनंद होतो की, सत्ताधारी पक्षाकडूनच विचारणा होते. अन्यथा प्रस्ताव मंजुर होतात.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :शाळेचे आरक्षण आहे पूर्वी काही खोल्या बोधलेल्या आहे शाळेसाठी जागा आरक्षीत केल्यानंतर तेथे शाळाच बांधायला पाहिजे होती. एकमेव योजना अशी आहे शाळेची एक खोलीचे बांधकामसाठी २.३० लक्ष अनुदान शासनाकडुन मिळते दुसरे कोणत्याही कामासाठी पाहिजे तेवढे अनुदान मिळत नाही.अनेक ठिकाणी आरक्षण वेगळया कामासाठी व बांधकाम दुसरेच झाले ज्या शाळा डीपी प्लॅन मध्ये येत असेल तर मार्ग काढून कार्यवाही करावी लागणार आहे तेथील दुकाने काढून शाळेची इमारतीसाठी सर्वशिक्षा अभियान मार्फत शासनाकडून अनुदान घेवू शकतो हे करणे योग्य आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :दुकाने कुणी बांधली. कुणाच्या मालकीची आहे. दुकाने बांधली तेंव्हा जागा शाळेसाठी आरक्षीत होती का ?

श्री.अशरफ मोतीवाला :३० वर्षापूर्वी बाजार समितीने दुकाने बांधली आहे.

मा.महापौर :सदर दुकाने शाळेसाठी आरक्षीत जागा असतांना कुणी व केंव्हा बांधली होती यांची माहिती प्रशासनाने घेवून पुढील बैठकीत सादर करावी. हा शाळेच्या संबधीत विषय असल्याने मान्यता देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मो.जिन्सी येथील सिटीएस क्र.९२३३/१ पैकी ९६४.८० चौ.मी.शाळेसाठी आरक्षीत व संपादीत जागेवर सर्व शिक्षा अभियान सन २००८-०९ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र आर्थिक शिक्षण परिषद मुंबई कडून उपलब्ध होणाऱ्या निधीतून अंतर्गत शालेय इमारत

बांधणेस तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या १० जुनी दुकाने तोडणेच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६६ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर व परिसरासाठी सन २०३८ साल ची संकल्पीत लोकसंख्या व त्यानुसार पाण्याची संभाव्य गरज लक्षात घेता आज नवीन पाणीपुरवठा योजनेची अत्यंत आवश्यकता आहे. सदर योजना कार्यान्वित होण्यासाठी, प्रशासकीय बाबी व कार्यादेश दिल्या नंतर बांधकामाचा कालावधी पाहता, साधारणतः ४ ते ५ वर्षानंतर प्रत्यक्ष पाण्याची उपलब्धता होईल. आज शहराला सर्व पाणीपुरवठा योजना मिळून एकत्रीत रित्या १२० ते १२२ द.ल.ली. पाणी मिळत आहे व शहराची आजची निव्वळ गरज १७० द.ल.ली. इतकी आहे. त्यामूळे उपरोक्त नवीन योजनेच्या दृष्टीने त्वरीत कार्यवाही होणे अत्यंत गरजेचे आहे. आज शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जायकवाडीवरील दोन मुख्य योजनांपैकी सन १९७६ सालची योजना अत्यंत जूनी झाली असून,कधीही बंद होवू शकते. त्यावेळी साधारणतः ३० ते ३५% शहराच्या भागाला महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा करणे अत्यंत कठीण होईल परिणामी भीषण पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या उपलब्ध होणाऱ्या पाणी परिमाणातून आजचीही गरज पूर्ण होत नसल्याने शहराला एक दिवस आड पाणी पुरवठा करावा लागत आहे.

वरील बाबी पाहता, नवीन समांतर योजना राबविण्याच्या दृष्टीने जायकवाडी धरण उद्‌भव गृहीत धरून समांतर पाणीपुरवठा योजना सन २०३८ करीता सविस्तर आराखडे व अंदाजपत्रके सन २००५-०६ साली तयार करण्यात आले. सदर योजना सन २०३८ च्या संकल्पीत २५ लक्ष लोक संख्येस गृहीत धरून आखण्यात आली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसुची सन २००५-०६ नुसार योजनेची अंदाजे किंमत रूपये ३९०.५२ कोटी होती. सदर खर्च व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता, वरील प्रस्तावीत योजना महानगरपालिकेतर्फे राबविणे शक्य नसल्यामुळे BOOT तत्वावर योजना राबविण्यासाठी कार्यवाही करण्यात आली होती. देशपातळी वर निविदा बोलावल्या नंतर तीन निविदाही प्राप्त झाल्या होत्या. त्यांची तांत्रिक बाबींची तपासणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद मार्फत करून घेण्यात आली परंतू, Financial offer उघडण्यात आल्या नाहीत. सदर निविदे अंतर्गत संपूर्ण योजनेची कामे संबंधित अभिकर्त्याने पूर्ण करावीत व योजनेची ३० वर्ष देखभाल दुरूस्ती व संचलनाचे काम करावे असे अभिप्रेत होते. त्याकरीता अभिकर्त्या कडून प्रती घनमीटरसाठी पाण्याचा दर मागविला होता. तथापि,नवीन समांतर पाणीपुरवठा योजनेचे काम BOOT तत्वावर न करता राज्य शासन व केंद्र शासना कडून अर्थ सहाय्य उपलब्ध करून योजना राबवावी असे निर्देश मा.सर्वसाधारण सभेने दिनांक २७/१०/२००६ रोजी दिले. त्यामुळे ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने सन २००५ मध्ये जाहीर केलेल्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूज्जीवन अभियान (JNNURM) अंतर्गत City Devlopment Plan (CDP) तयार करून अभियाना मध्ये औरंगाबाद शहराचा समावेश करून अनुदान मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. तथापि सन २००१ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या दहा लक्ष पेक्षा कमी असल्याने JNNURM अभियाना मध्ये औरंगाबाद शहराचा समावेश झाला नाही. वस्तुतः आजची लोक संख्या दहा लक्ष पेक्षा जास्त आहे.

त्यानंतर केंद्र शासनाने लहान व मध्यम शहरांसाठी पायाभुत सुविधांची विकास योजना (UIDSSMT) अभियान जाहीर केले. या अभियाना अंतर्गत महानगरपालिकेने समांतर पाणीपुरवठा योजनेचा रितसर प्रस्ताव दाखल केला होता. प्रस्तावा अंतर्गत योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून तांत्रिक तपासणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालया कडून पूर्ण केली व प्रस्तावाचे सविस्तर सादरीकरण राज्यस्तरीय निवड समितीच्या दुसऱ्या व चौथ्या बैठकीमध्ये करण्यात आले. तथापी UIDSSMT या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी एकुण मंजुर तरतुद कमी

असल्याने व समांतर पाणीपुरवठा योजनेची किंमत जास्त असल्यामुळे UIDSSMT योजने अंतर्गत ही महानगरपालिकेला अनुदान प्राप्त होऊ शकले नाही.

आज सन २००८-०९ हे आर्थिक वर्ष सुरू असून सध्याच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुची २००७-०८ नुसार योजनेची किंमत साधारणतः ३५ ते ४०% वाढण्याची शक्यता आहे. नवीन दरसुचीमुळे रू.३९०.५२ कोटी योजनेच्या किंमतीमध्ये होणारी वाढ पाहता, योजनेचा प्रस्ताव सुधारीत करणे आवश्यक आहे. याकरीता यापुर्वी अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असलेल्या अनुभवी प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थी (PMC) ची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यासाठी युनिटी कन्सल्टंट्स प्रायव्हेट लिमिटेड पुणे या अनुभवी PMC ची नेमणूक करण्याचे प्रस्तावीत आहे. प्रस्तावीत PMC कडून खालील कामे अपेक्षित आहेत.

- अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचे,उद्‌भव ते शहरा अंतर्गत वितरण प्रणाली यांचा सविस्तर अभ्यास व सर्वेक्षण करणे.
- प्रस्तावित वाढीव पाणी पुरवठा योजनेचे नव्याने संकल्पन,आराखडा व नवीन दरसुची नुसार अंदाजपत्रके तयार करणे.
- उपरोक्त प्रमाणे सर्वकष एकत्रित प्रस्ताव मा.केंद्र शासनाकडे सादर करून सदर प्रस्तावास मंजुरी प्राप्त करून घेणे.
- प्रस्तावीत पाणीपुरवठा योजनेसाठी मा.केंद्र शासनाकडून अनुदान मिळविणे.

उपरोक्त कामे करण्यासाठी वर नमुद केलेले संकल्पनार्थी/कन्सल्टंट हे महानगरपालिकेला सहकार्य करतील व प्रस्तावीत पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव मंजुर झाल्यावर तसेच प्रत्यक्षात निधी प्राप्त झाल्यावरच प्राप्त निधीच्या २.५०% प्रमाणे संबंधित संस्थेची फी अदा करण्यात येईल. अन्यथा कुठलाही मोबदला संबंधीत संस्थेला/कन्सल्टंटस यांना महानगरपालिका अदा करणार नाही. याकरीता,युनिटी कन्सल्टंटस प्राईव्हेट लिमिटेड,पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थी (PMC) म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>चर्चा :</u>**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:या विषया सबंधी मा.आयुक्ताकडून अगोदर खुलासा घ्यावा. त्यानंतर चर्चा करणे सोयीस्कर होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :समांतर जलवाहिनीसाठी मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे साहेब यांनी केंद्र शासनाकडून निधी मिळवून दिला त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करावे.

याच वेळी सभागृहात स.सदस्यांचे आपआपसात मोठमोठयाने बोलणे चालू असते ऐकू येत नाही.

श्री.संजय जगताप :स्थानिक आमदार यांनी यासाठी प्रयत्न केले त्यांचे अभिनंदन करावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेराय:ज्या लोकप्रतिनिधी व मान्यवरांनी हा निधी मिळवण्यासाठी सहकार्य केले त्या सर्वांचे अभिनंदन करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :अभिनंदनाचा ठराव ठेवण्यात आला. आम्ही ही या सभागृहाचे सदस्य आहोत. समांतर जलवाहिनीसाठी काय घडामोडी होत आहे कोण काय करते हे सर्वांना माहित आहे.शहर वासीयांचा हा महत्वाचा विषय आहे. ज्यांनी निधी मिळविण्यासाठी प्रयत्न केले त्यांचे अभिनंदन करावे दुमत नाही.प्रसार माध्यमातून निधी मंजूर झाल्याची माहिती मिळाली परंतू जे पत्र आलेले आहे ते सभागृहात वाचून दाखवायला पाहिजे होते. कोणत्या स्कीम मध्ये निधी आलेला आहे किती रक्कम महापालिकेला टाकावी लागणार आहे. २८८ कोटी निधी मिळणार आहे का कोणत्या योजनेतून व परतफेड किती असणार आहे.शासन किती निधी देणार महापालिका किती टाकणार आहे. शासनाकडून यास मंजूरी मिळाली किंवा काय याचा संपुर्ण खुलासा प्रशासनाकडून घेण्यात यावा.

मा.महापौर :या प्रस्तावा विषयी सविस्तर निवेदन मा.आयुक्तांनी करावे.

मा.आयुक्त :येथे रूजु होऊन मला दोन महिने होत आहे सुरूवातीलाच या संदर्भात चर्चा झाली होती IDSMT खाली ३६०कोटीचा प्रस्ताव पुर्वीच्या आयुक्त पुढाकार घेवून केंद्र शासनाकडे पाठविलेला होता. मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे साहेब यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता शासनाकडे प्रलबीत होता दरम्यानच्या काळात समातंर जलवाहिनी ही बीओटी तत्वावर करण्याची निविदा काढली परंतू ते नंतर रद्य केले आहे कारण त्यांचा भुर्दंड लोकांना जास्त पडला असता जे पाणी ८/-रू प्रति हजार लिटर प्रमोणे पाणी मिळायला पाहिजे ते १७.५०रू.प्रमाणे घ्यावे लागले असते तो बीओटी तत्वावर करण्याचा ठराव महापालिकेने रद्य केला. अशी परीस्थिती मी पिपंरी चिचवंड महापालिकेत काम करतांना झाली होती.एक प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला तो शासनाने मंजूरही केला प्रत्यक्षात अमलबजावणी करतेवेळी दोनपट किमंत वाढली त्या महापालिकेची आर्थीक परीस्थिती बरी होती तो खर्च करणे शक्य झाले महापालिकेकडून प्रस्ताव गेल्यानंतर मा.खासदार श्री.खैरे साहेंब यांनी पुढाकार घेवून ३६० कोटीचा प्रस्ताव होता मान्य केला म्हणून तसे पत्र त्यांना मिळाले आहे तो आयडीएसएमटी खाली मंजूर केला यानुसार डायरेक्ट महापालिकेला तो निधी येणार नाही. केंद्र शासन राज्यशासनाकडे देते राज्य शासनाकडे प्राधान्य क्रमाची यादी तयार केलेली असते त्या त्या प्रमाणे ज्या त्या महापालिकेला अनुदान मिळते.मा.खासदारांचा यात पुढाकार होता निधी आणण्याचा प्रयत्न केला तर जास्तीत जास्त २८८ कोटीच मिळू शकतील परंतू समांतर जलवाहिनीसाठी ५०० ते ५२५ कोटीचा खर्च लागणार असून २०० ते २५० कोटीचा भुंर्दड महापालिकेला लागणार आहे. तेवढा खर्च करण्याची परीस्थिती या महापालिकेची नाही. म्हणून अत्यंत महत्वाचा विषय आहे राज्य शासनाने यास आज मान्यता दिली तरी राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर पुन्हा केंद्र शासनाकडे जाणार आहे. मध्यतंरीच्या काळात मा. मुख्यमंत्री या शहरात आले त्यावेळी मी त्यांचेशी चर्चाही केली की या महापालिकेची २८८ कोटीच्या वरील रक्कम खर्च करण्याची तशी महापालिकेची आर्थीक परीस्थिती नाही. म्हणून विशेष बाब म्हणून हा प्रस्ताव पुन्हा राज्य शासनाकडून पाठवावा. त्यानंतर सर्वांनी मिळून सहकार्य केले तर यश येईलच परवाच खासदार श्री.खैरे साहेब योचेशी माझी चर्चा झाली २२ तारखेला ते दिल्लीला गेले केंद्र शासनाचे संचालक श्री. श्रीवास्तव यांचेशी त्यांनी जास्तीचा निधी मिळावा म्हणून मत मांडले मी सुध्दा येथील परीस्थितीची जाणीव करून दिली की २८८ कोटी मंजूर केले तर पूढील रक्कम टाकण्यास या महापालिकेला बोजा पडणार आहे. एकदा केंद्र शासनाने अंतिम मान्यता दिल्यानंतर त्यांचे रिवाईज बजेट होत नाही.हा बेसीक मुद्या केंद्र शासनामध्ये आहे.म्हणून २८८ कोटीच नव्हे तर जास्तीत जास्त निधी केंद्र शासनाकडून कसा मान्य करून घेता येईल यासाठी प्रयत्न असावे.आयडीएसएसएमटी खाली असेल तर ८० टक्के केंद्र शासन १० टक्के राज्य शासन व १० टक्के महापालिकेचा सहभाग असेल. अेडीशनल इतर जास्तीचा खर्च असेल तर त्यास शासन मंजूरी देत नाही तो महापालिकेला खर्च करावा लागेल. या संदर्भात मा. खासदार श्री.खैरे साहेब यांचेशी चर्चा केली तसेच श्री. जैस्वाल साहेबांशी चर्चा केली राज्य शासनाची मान्यता घेवून रिवाईज प्रस्ताव पाठवावा म्हणून म्हटले. व हा प्रस्ताव

रिवाईज करून पाठविणे सोयीस्कर राहील निधी जास्त मिळू शकेल. केंद्र शासनाच्या दोन योजना असतात एक आयडीएसएसएमटी खाली व दुसरे जेएनएनयुआरएम यात आपले शहर आलेले नाही. २००१ मध्ये लोकसंख्या १० लक्ष पेक्षा कमी होती.विशेषत :यात हा ठराव मान्य करून घेतला तर जे नादेंडमध्ये झालेला आहे तेथील लोकसंख्या कमी आहे. तरी सुध्दा गुरूतागदी या नावाखाली १३०० कोटीचे प्रस्ताव मंजूर झालेले आहे. यात ५० टक्के केंद्र शासन २० टक्के राज्य शासन व ३० टक्के निधी हा महापालिकेला टाकावा लागतो.महापालिकेची परीस्थिती चांगली नसेल तर ३० टक्के रक्कम कशी कमी करावी याचे प्लॅनीग करता येते. अशा वेळ काही संस्थाकडून कर्ज घेण्याची गरज पडली तर तशी तरतूद आहे. किंवा ३० टक्केच्या खर्चाच्या संदर्भात वेगळे निर्णय घेता येवू शकेल. आज रिवाईज खर्चाचा प्रस्ताव केला तर तो ५२५ कोटीपर्यत जाईल जेवढा उशीर होईल तेवढी खर्चाची कॉस्ट वाढतच जाणार आहे. पैठणहून ३० मिटरच्या रस्त्याच्या बाजूला ॲडीशिनल जागा भुसंपादन करण्याचा प्रस्ताव होता त्या संदर्भात बांधकाम विभागाचे संबधीत अधिकारी त्यांचेशी चर्चा केली ॲडीशिनल जागा न घेता ३० मीटरच्या रस्त्यातील ३ मीटर जागा दयावी कारण भुंसपादनाचा प्रस्ताव करायला गेलो तर त्यात वेळ जाणार लोकांचा विरोधही होणार व प्रत्यक्ष जलवाहिनी टाकण्यास अडथळा निर्माण होणार आहे. हा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्य केला आहे. त्या रस्त्याचे पुन्हा नव्याने डिझाईन केले जाईल व बॉर्डरवरून तीन मीटरच्या स्पेसवर जागा सोडतो.त्या जागेत पाईप लाईन टाकली जाईल.नवीन जलवाहिनी टाकणे झाल्यानंतर पुर्वीची जलवाहिनी बंद न करता ज्या गावांना नगरपालिकेला पाणी देण्याचे पुर्वीचे कमेन्टमेंन्ट आहे त्यांना पाणी देवू व नवीन जलवाहिनीव्दारे सरळ पाणी शहरात आणले जाईल. आज १२० एमएलडी पाणी उलचण्याची यंत्रणा आहे त्यात वाढ होवून ३०० एमएलडी पर्यत पाणी उचलू शकतो. व त्यानुसारच या शहराचा विकास होईल.व पाणी उपलब्ध होवू शकेल.रिवाईज प्रस्ताव आता मान्य केला तर काही कमेन्टमेंन्ट शासनाला दयावे लागतात मेंन्टनन्स कॉस्ट जी आहे ती ग्राहकाकडून वसूल केली जाईल. पुर्वीचा निधी मंजूर झाला त्यास अंतिम मान्यता होण्यासाठी दोन महिणे लागणार आहे रिवाईज प्रस्ताव गेला तरी त्यास दोनच महिणे लागणार आहे.म्हणून सर्वांनीच या बाबतीत विचार करून सर्वांनाच यात श्रेय दयावे. म्हणून सुधारीत प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवून तेथून केंद्र शासनाकडे पाठवून जास्तीचा निधी कसा मंजूर करता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे या प्रस्तावास मान्यता दयावी.

डॉ.भागवत कराड :५११ कोटीची योजना ही फक्त पैठण ते कांचनवाडी पर्यत आहे डिस्ट्रीब्युशनसाठी १६०-१७० कोटी लागणार आहे ते यात ॲड करावे.या प्रस्तावावर परत काही सुचना सुचवायच्या आहे. मंजूरी दयावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:पूर्वीचा जो ठराव होता त्याच बरोबर आता पीएमसी नियुक्त करण्याचाही ठराव आहे पुर्वीचा ठराव हा पूर्णपणे पीएमसीच्या माध्यमातून होता. मंजूरीही पीएमसीने आणावी सर्व कामे करावी. मा.खासदार व सर्वांनी सहकार्य करून जे मंजूरी आली ५० टक्के काम केले. ही योजना मान्य आहे. परंतू संपूर्ण खर्च हा ५११ कोटीचा अपेक्षीत आहे तो प्रस्ताव आयुक्तांनी सादर केला. जास्तीचा निधी यासाठी लागेल पीएमसी नियुक्त करण्याचा निर्णय घ्यावा व

पुढील कार्यवाहीसाठी मा.आयुक्त यांना सर्व अधिकार देण्यात यावे. ही पीएमसी सर्व काम करून देईल याची मला खात्री आहे. यात काही दुरूस्ती होवू शकते यात फायदाच होत असेल तर मंजूरी दयावी.

मा.आयुक्त :मी माझे निवेदन केलेले आहे यात बरेचशे काम कमी होणार आहे जे काम केलेले आहे त्यांचे नक्कीच खर्च कमी करायला पाहिजे.त्यामूळे रिवाईजमध्ये ऑलरेडी दिलेले आहे. केंद्र शासनाकडे प्रस्ताव गेल्यानंतर कन्स्ल्टन्सीला देणार आहे ते केंद्र शासन रक्कम देणार आहे

डॉ.भागवत कराड :२.५ टक्के किंवा केंद्र शासन जे देईल या दोन्हीपैकी जे कमी असेल ती रक्कम देता येईल.५११ कोटीची ही योजना आहे व डिस्ट्रीब्युशन सुध्दा चांगले झाले पाहिजे त्यासाठी जास्तीच्या खर्चाचे यात ॲड करावे.या योजनेचे सर्व काम जे की नागरीकांना पाणी मिळेपर्यत जे ही काम असेल ते या कन्सलटन्सीला दयावे.

श्री.गजानन बारवाल :मा.खासदार श्री.खैरे साहेब यांचेशी चर्चा झाली आजही ते मुंबईला याच कामासाठी गेलेले आहे.प्रस्ताव घेवून गेलेले आहे या प्रस्तावावर पुन्हा ते सविस्तर चर्चा करणार आहे. व दिल्लीला शासन दरबारी पून्हा चर्चा करून संबधीत विभागाचे अधिकारी हे मा.आयुक्तांशी पुन्हा चर्चा करणार आहे. मा.ना.श्री. शरदजी पवार सुध्दा सहकार्य करणार आहे व २८८ जे मंजूर केले ते कमी पडतात व या कामासाठी एकदम टेंडर काढणे जरूरी आहे म्हणून गाऱ्हाणे मांडणार आहे संपूर्ण निधी मंजूर झाल्याचे पत्र मा.आयुक्तांनाकडे येणार डॉ.एम.चंद्रशेखर यांचेकडून यायला पाहिजे पुढील कार्यवाहीसाठी सुचना येतील.आज मुंबईला आहेत उदया दिल्लीला जाणार आहेत मा.आयुक्तासह चर्चा करणार आहेत.

श्री.नासेर नाहदी शहराला पिण्याचे पाणी देणे आवश्यक आहे समांतर जलवाहिनीची गरज आहे यात दुमत नाही जागा मोफत मिळते चांगली बाब आहे परंतु युनीटी कन्स्ल्टनन्टला नेमले तसेच डायरेक्ट काम देवू शकतो का ?कायद्यात आहे का वृत्तपत्रात जाहिरात न देता हे कसे आले सभागृहास या बाबत माहिती नाही पीएमसी कार्यशाळाही घेतो.

श्री.संजय जोशी :शहराला पाणीपुरवठा वाढेल या अपेक्षेचे यापूर्वी ६५ कोटीची योजना केली होती. पंप दुरूस्त केले बराच खर्च झाला टाक्या बांधल्या नाही पाणीपुरवठयात वाढ झाली नाही.आताच खुलासा केला ५११ कोटीच्या खर्चात पाणी काचंनवाडीपर्यत येणार जेंव्हा पीएमसीने या शिवाय डिस्ट्रीब्युशनसाठी १६० कोटी वेगळा खर्च लागणार आहे हे नक्षत्रवाडी पर्यतच आहे.शहरातील अंतर्गत डिस्ट्रीब्युशनसाठी काय व्यवस्था करणार आहे.नेहमीच पाईपलाईन नक्षत्रवाडीच्या अलीकडे व शहराच्या पलीकडे फुटते पूढे पुन्हा जुन्याच लाईनने पाणी आणण्याची वेळ येवू नये. या योजनेचा शहराला कितपत फायदा होणार याचाही खूलासा करावा.पुरेसा फायदा होणार नसेल तर डिस्ट्रीब्युशनच्या खर्चासाठी १६० कोटी सुध्दा ॲड करून पाठवावे.शहराचा पाणीप्रश्न कायमचा सुटेल.

मा.आयुक्त :प्रस्ताव हा मुख्य समातंर जलवाहिनीसाठी आहे.डिस्ट्रीब्युशनच्या खर्चासाठी नव्हता. तो खर्च यात यायला पाहिजे. जर जो निधीची मागणी करतो तो आकडा जास्त वाढल्यास केंद्र शासन मंजूरी देईल की नाही भिती आहे. इन्टरनल डिस्ट्रीब्युशनचा प्रस्ताव हा वेगळा असणार आहे.

श्री.संजय जोशी :दोन्ही प्रपोजल हे पाण्याचेच आहे. एकत्रित मान्यता आणावी.

मा.आयुक्त :जो मुद्या उपस्थित केला तो ही महत्वाचा आहे परंतू दोन्ही खर्चाचा निधीची मागणी केल्यास निधीची रक्कम मोठी होते आकडा मोठा होईल व शासन तेवढी मान्यता देईल की नाही शंका येते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आताच म्हटले रिवाईज केले नाही तर पुन्हा वरील खर्चास मान्यता मिळणार नाही दिल्लीगेट पर्यत ही लाईन आणावी अशी आमची मागणी आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:डिस्ट्रीब्युशनसाठी जो खर्च लागेल तो वेगळा प्रस्ताव तयार करावा.यानंतर मान्यता घेता येईल. समातंर जलवाहिनी अगोदर व्हावी.शहराला पाणी दयावे.

डॉ.भागवत कराड :५११ कोटीचा प्रस्ताव ताबडतोब पाठवावा नक्षत्रवाडीपर्यत पाणी आणले तरी प्रश्न सुटणार नाही डिस्ट्रीब्युशनसाठी १०६ कोटीचा वेगळा पॅररल प्रस्ताव करावा तो सुध्दा दयावा.दोन्ही मंजूर झाले तर योग्य होईल नाही झाले तर ५११ कोटीचा तरी मंजूर करून आणावा १०६ कोटीसाठी पुन्हा प्रयत्न करता येईल.

श्री.गजानन बारवाल :पीएमसी नेमण्यासाठी हा प्रस्ताव आताच मंजूर करू नये.

श्री.भगवान घडमोडे :यापूर्वी खाजगीकरणाच्या माध्यमातून ही योजना करणार अशी चर्चा व प्रस्ताव आला जनतेवर बोजा पडू नये म्हणून त्यास विरोध झाला ते योग्य ही होते. जनतेत असा संभ्रम निर्माण झाला की हा प्रस्ताव सुध्दा खाजगीकरणाच्या माध्यमातून होतो आहे. परंतू खाजगीकरणाच्या माध्यमातून नसून शासनाकडून अनुदान मिळविण्याचा प्रस्ताव आहे. या जिल्हयाचे मा.खासदार नेहमीच विकासाच्या बाबतीत जागृत असतात आज सुध्दा याच कामासाठी ते मुंबईला आहे. या शहराला पाणी मिळाले पाहिजे ही त्यांची व आमच्या सर्व लोकप्रतिनिधीची प्रामाणिक इच्छा आहे.आताच प्रशासनाने खुलासा केला अंतिम मान्यता झाल्यानंतर पुन्हा रिवाईज प्रस्ताव करता येत नाही यात आणखी रक्कम वाढत गेली तर शासन सुध्दा मंजूरी देईल की नाही शंका येते.व आपणास भूर्दंड वाढेल पीएमसी नियुक्त करावी.नाही तर प्रस्ताव तयार करणे प्रकल्प अहवाल कोण करणार ,डिझाईन करणे सादरीकरण कोण करेल असा प्रश्न आहे त्यासाठी पीएमसी नेमणे आवश्यक आहे शहरातील जनतेचे हित लक्षात घेवून ही योजना जास्त दिवस रखडू नये जनतेवर जास्त बोजाही पडू नये या दृष्टीने हा ठराव मंजूर करण्यास हरकत नसावी.जनतेला पाणी मिळेल हेच समोर ठेवावे कुणाला याचे श्रेय जाईल याचा विचार न करता जे जे सहकार्य करतील त्या सर्वांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन

श्रीमती मेहरून्नीसा खान:प्रस्ताव चांगला आहे पीएमसी साठी टेंडर कॉल करावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :समांतर जलवाहिनीसाठी लोक प्रतिनिधी जागृत आहे त्या सर्वांचे अभिनंदन करतो.पाणी आणणे व डिस्ट्रीब्युशन या दोन्ही गोष्टी वेगवेगळया आहे-दोन्ही कामाच्या निधीला केंद्र शासनाची मंजूरी देण्याची क्षमता असेल तर एकत्रित करावे नसता इंनटरनल लाईन साठी वेगळा प्रस्ताव करावा राज्य शासनाच्या वेगवेगळया स्कीममध्ये मान्यता येत असेल तर यासाठी प्रयत्न करावे. हा प्रस्ताव लवकर तयार करून पाठविण्यास मान्यता दयावी.

श्री.अ.रशिद खान :ज्या सहा लोकप्रतिनिधीनी यासाठी सहकार्य केले त्यांचे अभिनंदन त्यांना लेखी पत्र देवून कळवावे. व सुधारीत प्रस्ताव देणार आहे यासाठी सहकार्य करावे म्हणून कळवावे. भारताचे मा.पंतप्रधान श्री.मनमोहनसिंग यांनाही

अभिनंदनाचे पत्र दयावे. मा.आयुक्तांचाही चांगलाच सहभाग लाभत आहे त्यांचे अभिनंदन करावे ही पीएमसी चांगले काम करीत असेल तर काम देण्यास हरकत नसावी.यास मंजूरी दयावी पिंप्री चिंचवड महानगरपालिकेत काम केलेले आहे.

मा.महापौर :डायरेक्ट पीएमसी नेमता येते का याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त : १० लक्षपर्यतचे काम असेल तर स्थायी समितीच्या मान्यतेने व त्यावरील असेल तर सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने देवू शकतो.

श्री.संजय जगताप :समांतर जलवाहिनीचे स्वागत पीएमसी साठी टेंडर कॉल करण्यास काय हरकत आहे कमी दरामध्ये कुणी काम करण्यास तयार असेल तर महापालिकेचा फायदा होईल.

मा.आयुक्त :पीएमसी नियुक्त केली नाही तर प्रस्ताव कोण तयार करून पाठविणार आहे.पीएमसी नेमल्यावरच कळणार आहे.

डॉ.भागवत कराड :केंद्र शासनाकडून ही योजना मंजूर होण्याच्या मार्गावर आहे. कुठलाही विरोध न होता मंजूर करावे. डिस्ट्रीब्युशनच्या खर्चासाठी वेगळा प्रस्ताव तयार करून त्यासही मंजुरी देवून पाठवावे.

श्री.महेश मांळवतकर :शहरातील सर्व जनतेचे लक्ष या ठरावाच्या निर्णयाकडे आहे.शहरातील १२ लाख लोकसंख्येच्या दृष्टीने प्रस्ताव ठेवलेला आहे.

याच वेळी मा. महापौर डायस समोर अनेक स. सदस्य एकत्र येतात व मोठमोठयाने बोलत असतात.

मा.महापौर :या विषयावर प्राथमिक स्वरूपात जवळपास सर्वच सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त केल्या आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :आम्हास संधी दिली नाही आम्ही बोललो नाही.

सौ.लता दलाल :आम्ही आमच्या भावना व्यक्त केलेल्या नाही. आम्हाला बोलू दयावे.

श्री.नासेर नाहदी :डायरेक्ट पीएमसी नेमता येतो का?

श्री.मिलींद दाभाडे :पीएमसी नेमण्यासाठी टेंडर काढले नाही.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. या विषयामध्ये आपण सर्वांनी पुरेशी चर्चा केलेली आहे.

श्री.संतोष जेजूरकर : पीएमसी नेमू नये त्यास आमचा विरोध आहे.

याच वेळी हा प्रस्ताव मंजूर करावा म्हणून अनेक स.सदस्य मोठमोठयाने मागणी करतात दुरूस्तीसह मंजूरी दयावी अशी मागणी करतात

मा.महापौर :मा.खासदार श्री.चंद्रकांत खैरे साहेब व मा.केंद्रीय कृषीमंत्री श्री.शरद पवार यांच्या मदतीने केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा केला. मा.गोपिनाथजी मुंडे यांच्या पुढाकाराने मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या समवेत बैठका झाल्या तसेच मा.राष्ट्रपती मा.पंतप्रधान मा.केंद्रिय नगर विकास मंत्री यांच्यासोबत महापौर व मनपा पदाधिकारी व मा.खासदार यांनी या योजने संदर्भात भेट घेवून चर्चा केली. व यांच्या पुढाकाराने निधी मंजूरीस चालना मिळाली तसेच मा.केंद्रीय सचिव शहरी विकास यांनी दि.२५.०७.२००८ रोजी मा.खासदार यांना ३६० कोटीची योजना मंजूर झाल्याचे व त्यातुन २८८ कोटी अर्थसहाय्य देण्याचे कळविले. प्रस्तावास ३ वर्ष झाले यात पोलादी पाईपची किंमत जास्त असून एम एस पाईपचे मुळ दर २००५-२००६ च्या दरसुचीच्या तुलनेत आजच्या बाजारभावाप्रमाणे ३५ रूपये प्र.कि. वरून ५३ रूपये झाले आहे. बांधकाम साहित्य,पाईप,मशिनरी यांचे दर वाढल्यामुळे या योजनेचे टप्पा एक जायकवाडी ते नक्षत्रवाडी मेन लाईन साठी सुमारे

रू.५११ कोटी व दुस-या टप्प्यात शहराची जुनी वितरण व्यवस्था बदलने बळकटीकरण जलकुंभ बांधणे इत्यादी तत्सम कामासाठी सुमारे रू.१६० कोटी असे एकुण रू.६७१ कोटी पर्यंत खर्च जाईल. व प्रत्यक्षात प्रकल्प तयार होईपर्यंत किंमतीत वाढ होउ शकते. या संभाव्यवाढीस देखील मान्यता देण्यात येते. युआयडीएसएसएमटी अंतर्गत २८८ कोटीत ५० टक्केही काम पुर्ण होणार नाही. २०४१ ची लोकसंख्या विचारात घेवून योजना सुधारीत करण्यासाठी युनिटी कंन्सल्टन्ट पुणे, अनुभवी P.M.C नेमुन JNNURM/ UDISSMT अंतर्गत केंद्रशासनाकडे निधीसाठी नविन प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यासाठी राज्य व केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविणे,पत्रव्यववहार करणे, अंदाजपत्रकास मंजुरी देणे इत्यादी सर्व कामास मा.आयुक्त मनपा यांना प्राधिकृत करण्यात येते. व हे ऐतिहासिक शहर असल्याने इतर काही योजना असल्यास त्यातुन जास्तीत जास्त निधी प्राप्त करून ड्रेनेज,रस्ते,बीआरटी ई.चे प्रस्ताव तयार करणे, अंदाजपत्रके मंजूर करणे, व शासनास आवश्यक तो पत्रव्यवहार करणेसाठी मा.आयुक्त मनपा यांना प्राधिकृत करण्यात येते. वरील दुरूस्तीसह प्रस्तावित व सुधारीत प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

औरंगाबाद शहर समांतर जलवाहिनी योजनेचा प्रस्ताव सन २००५-०६ मध्ये तयार केला. केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुज्जीवन अभियान (JNNURM) अंतर्गत औरंगाबाद शहराचा समावेश होण्यासाठी महानगरपालिकेतर्फे City Development Plan तयार करुन प्रयत्न करण्यात आला. परंतु सन २००१ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या १० लक्षपेक्षा कमी असल्याने या अभियानामध्ये समावेश होऊ शकला नाही. पर्यायाने समांतर जलवाहिनी योजनेस अनुदान मिळाले नाही. सन २००५ मध्ये केंद्र शासनाने लहान व मध्यम शहरांसाठी पायाभुत सुविधांची विकास योजना (UIDSSMT) हे अभियान जाहीर केले. औरंगाबाद महानगरपालिकेने या अभियानाच्या निकषानुसार रुपये ३९०.५२ कोटी किमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे कार्यालयाची तांत्रिक मान्यता घेतली व मा.महाराष्ट्र शासनामार्फत मा.केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केला. या अभियाना अंतर्गत मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय निवड समितीच्या दिनांक २८.०९.२००६ व दिनांक ०४.०५.२००७ रोजीच्या अनुक्रमे दुस-या व चौथ्या बैठकीमध्ये प्रस्तावाचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. परंतु ही योजना फक्त लहान व मध्यम शहरांसाठी असल्याने व या योजनेत महाराष्ट्र राज्यासाठी एकुण कमी तरतुद मंजुर असल्याने समांतर जलवाहिनीच्या रुपये ३९०.५२ कोटी किमतीच्या योजनेस मान्यता मिळाली नाही.

त्यानंतर औरंगाबाद जिल्ह्याचे मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे यांनी मा.श्री.शरदचंद्रजी पवार, केंद्रीय कृषी मंत्री यांच्या मदतीने मा.केंद्र शासनाकडे व मा.राज्य शासनाकडे या संबंधाने पाठपुरावा केला. या प्रकरणी मा.श्री. गोपीनाथजी मुंडे यांच्या पुढाकाराने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे समवेत बैठका झाल्या. त्यानंतर मा. राष्ट्रपती, भारत सरकार, मा.पंतप्रधान,भारत सरकार व मा.श्री.जयपालजी रेड्डी, केंद्रीय नागरी विकास मंत्री यांच्या समवेत मा.खासदार, महापौर व मनपा पदाधिकारी यांनी भेटी घेऊन चर्चा केली.

मा.खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे व मा. श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या पुढाकाराने या योजनेस निधी मंजुरीसाठी चालना मिळाली. मा.सचिव, शहरी विकास मंत्रालय, दिल्ली यांनी दिनांक २५.०७.२००८ रोजी मा.खासदार यांना पत्र देऊन रुपये ३६० कोटी किमतीची योजना मंजुर

असल्याचे व त्यात रुपये २८८ कोटी चे अर्थसहाय्य मा.केंद्र सरकार करणार असल्याचे कळविले आहे.

मुळ योजना ही सन २००५-०६ च्या दरसुचीनुसार रुपये ३९०.५२ कोटी रकमेची तयार करण्यात आली होती. आज जवळपास तीन वर्षाचा कालावधी झालेला आहे. या योजनेत प्रामुख्याने पोलादी जलवाहिनीची किमंत जास्त आहे. MS Pipe चे बेसीक दर सन २००५-०६ च्या दरसुचीनुसार रुपये ३५ प्रती कि.ग्रॅ. होते. आज बाजारभावानुसार दर रुपये ५३ प्रती कि.ग्रॅ. असा आहे. बाजारात बांधकाम साहित्य, पाईप, मशिनरी आदी साहित्याचे दर खुप वाढलेले आहेत. त्यामुळे समांतर जलवाहिनी योजनेची किंमत टप्पा १ :- जायकवाडी जलाशय ते नक्षत्रवाडी संतुलन टाकी पर्यंत मुख्य जलवाहिनी टाकणे या कामासाठी ढोबळमानाने रुपये ५११ कोटी आणि टप्पा २ :- शहरातील जुनी जलवितरण व्यवस्था बदलून नविन जलवितरण व्यवस्था निर्माण करुन या वितरण व्यवस्थेचे बळकटीकरण करणे, जलकुंभ बांधणे इत्यादी तत्सम कामे करणे यास्तव ढोबळमानाने रुपये १६० कोटी असे एकुण साधारणतः रुपये ६७१ कोटीपर्यंत जाईल. प्रकल्प अहवाल प्रत्यक्ष तयार होई पर्यंत या किंमतीत कदाचित वाढ होऊ शकते. या संभावित वाढीस देखील मान्यता प्रदान करण्यात येते. मा. केंद्र शासनाने UIDSSMT अंतर्गत मंजुर केलेल्या रुपये २८८ कोटी अर्थसहाय्यातुन योजनेची ५०% कामेही पुर्ण होणार नाहीत. त्यामुळे योजना सन २०४१ करीता सुधारीत करणे व युनीटी कन्सल्टंट प्रा. लि., पुणे या अनुभवी प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थी ची नेमणुक करुन नव्याने मा.केंद्रशासनाकडे JNNURM/UIDSSMT अभियानातुन संपुर्ण रकमेसाठी निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यास्तव मा.आयुक्त, महानगरपालिका यांना सदरचे प्रस्ताव राज्य/केंद्र शासन यांचेकडे मंजुरीस्तव सादर करणे व त्यानुषंगाने करावयाचा पत्रव्यवहार, प्रस्ताव, अंदाजपत्रक मंजुरी आदी कार्यालयीन कामे करणेस्तव प्राधिकृत करण्यात येते. तसेच या पाणी पुरवठयाच्या प्रस्तावा बरोबरच आपले शहर हे ऐतिहासिक शहर असल्याने केंद्र शासनाकडून JNNURM किंवा UIDSSMT योजना किंवा शासनाच्या इतर काही योजना असल्यास त्यातून जास्तीत जास्त निधी प्राप्त करुन त्यातून शहराची मलनिःसारण (ड्रेनेज) प्रकल्पाची कामे,रस्ते,बी.आर.टी. इत्यादी प्रकल्पांची कामे करण्यासाठी व निधी मिळविण्यासाठी करावयाचे प्रस्ताव, अंदाजपत्रकांना मंजूरी तसेच त्यानुषंगाने शासनाशी करावयाचा पत्रव्यवहार आदी कार्यालयीन कार्यवाही करणेस्तव मा.आयुक्त,महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यात येते. त्यास ही सर्वसाधारण सभा मान्यता प्रदान करीत आहे.

उपरोक्त उल्लेखीत सर्व प्रकारची कामे करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थी म्हणून युनीटी कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांना नेमणेस मान्यता देण्यात येते. संबधीत संस्थेस प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावरच सविस्तर प्रकल्प अहवाल किमतीच्या २.३५% + Service Tax (at actual and as applicable from time to time as per Central Govt. norms which are १२.३६% at present for the year २००८-०९) किंवा केंद्र शासन सल्लागार फी म्हणुन मंजुर करेल ती रक्कम, यापैकी जी कमी असेल ती रक्कम, याप्रमाणे संस्थेची फी अदा करावी. तसेच युनीटी कन्सल्टंटस यांनी या वाढीव (समांतर) जलवाहिनी टाकणे, शहरातील वितरण व्यवस्थेचे बळकटीकरण करणे यासाठी योजनेची सुधारीत किंमत काढुन सुधारीत प्रस्ताव महानगरपालिकेच्या वतीने राज्य/केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्याची कार्यवाही करावी, त्यास ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. २६७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.५९ अंतर्गत सिल्लेखाना ते लक्ष्मणचावडी रोडवरील बी.एस.एन.एल. कार्यालयासमोरील चौकास रोकडीया हनुमान चौक असे नामकरण करण्यासाठी तेथील नागरीकांची मागणी आहे.

करीता नागरीकांच्या मागणीचा विचार करता सदर चौकास रोकडीया हनुमान चौक असे नामकरण करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात यावा ही विनंती.

सुचक : श्री.सतिष कटकटे अनुमोदक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५९ अंतर्गत सिल्लेखाना ते लक्ष्मणचावडी रोडवरील बी.एस.एन.एल. कार्यालयासमोरील चौकास पुर्वी नामकरण झाले नसल्यास रोकडीया हनुमान चौक असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६८ :**

प्रभाग क्र.७३ एन-२ प्रबोधनकार ठाकरे नगर, बी.एम २ विठ्ठल रूख्माई मंदीरा समोरील खेळण्याच्या मैदानावरील खुल्या सांस्कृतिक मंचास राष्ट्रमाता जीजामाता भोसले यांचे नांव देण्यांत यावे म्हणून परिसरातील नागरीकांची मागणी होत आहे.

तरी लोकांच्या भावनेचा विचार करता सदर मंचास राष्ट्रमाता जीजामाता भोसले यांचे नाव देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे

अनुमोदक : सौ.पुष्पा बाळुनाना शिंदे, श्री.बाबासाहेब डांगे, श्री.नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७३ एन-२ प्रबोधनकार ठाकरे नगर, बी.एम २ विठ्ठल रूख्माई मंदीरा समोरील खेळण्याच्या मैदानावरील खुल्या सांस्कृतिक मंचास राष्ट्रमाता जीजामाता भोसले यांचे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.९३ वेदांतनगर येथील आर्यानंद सहकारी भाडेकरू मालकी गृह निर्माण संस्था प्लॉट क्र.५, सिटी सर्वे नं. १८३४९/२४/०५ येथील खुली जागा ज्याचे क्षेत्रफळ ७९७.५९ चौ.मी. आहे सदर जागेवर सदर संस्था स्वत:च्या खर्चाने बहुउद्देशीय हॉल बांधण्यात यावा अशी मागणी करीत आहे.

नियोजीत बांधकामासाठी लागणारा निधी सोसायटीतर्फे उपलब्ध करण्यात येईल. करीता प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय शिरसाट अनुमोदक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९३ वेदांतनगर येथील आर्यानंद सहकारी भाडेकरू मालकी गृह निर्माण संस्था प्लॉट क्र.५, सिटी सर्वे नं. १८३४९/२४/०५ येथील खुली जागा ज्याचे क्षेत्रफळ ७९७.५९ चौ.मी. आहे सदर जागेवर सदर संस्था स्वत:च्या खर्चाने बहुउद्देशीय हॉल बांधण्यासाठी लागणारा निधी सोसायटीतर्फे उपलब्ध करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते तसेच सदर जागेवरील संपूर्ण मालकी व हक्क हा महानगरपालिकेचा राहील वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दि.२८.०२.२००७ सर्वसाधारण सभा प्रस्ताव क्र.७६४ औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिकेच्या वतीने २० ठिकाणी सुलभ शौचालय बांधून पे अँड युज या तत्वावर सुलभ इंटर नॅशनल या संस्थेला काम देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला होता. परंतु

काही ठिकाणी त्यांचे कामाविषयी नागरीकांच्या विविध कारणामूळे विरोध असल्याने ते काम पूर्ण करू शकत नाहीत. परिणामी शहरातील विविध ठिकाणचे सुलभ शौचालयांची कामे अपूर्ण आहेत. या कामी महानगरपालिकेने कोट्यावधी रू.चे टेंडर काढून संबंधीतास देयक अदा केली आहेत. उर्वरीत अपूर्ण कामासाठी शासन निर्णय डोक्यावरून किंवा हाताने मैला वाहने मेहतरांची नियुक्ती (प्रतिबंध) अधिनियम १९९३ कायदा कलम ४६ अन्वये या शासन निर्णयानुसार या शहरातील भूमीपुत्र या नात्याने होतकरू,गरजू,सुशिक्षित डॉ.वाल्मीकी मेहतर समाजाचे बेरोजगार सध्या मातीकाम करीत आहेत. अशा गरजू युवकांना रोजगार उपलब्ध होईल या दृष्टीने शहरातील सुलभ शौचालयाच्या अपूर्ण कामासाठी पे अँड युज तत्वावर चालविणे या कामासाठी भूमीपुत्र यांना किंवा महर्षि वाल्मीकी युवा विकास मंडळ गांधीनगर औरंगाबाद रजि.क्र.एफ.१२३७९ (औ) यांना देण्यात यावे.

सुचक : श्री.संजु सुग्रीव रिडलॉन अनुमोदक : श्री.संजय केनेकर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दि.२८.०२.२००७ सर्वसाधारण सभा प्रस्ताव क्र.७६४ औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिकेच्या वतीने २० ठिकाणी सुलभ शौचालय बांधून पे अँड युज या तत्वावर सुलभ इंटर नॅशनल या संस्थेला काम देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला होता. परंतु काही ठिकाणी त्यांचे कामाविषयी नागरीकांच्या विविध कारणामूळे विरोध असल्याने ते काम पूर्ण करू शकत नाहीत. परिणामी शहरातील विविध ठिकाणचे सुलभ शौचालयांची कामे अपूर्ण आहेत. या कामी महानगरपालिकेने कोट्यावधी रू.चे टेंडर काढून संबंधीतास देयक अदा केली आहेत. उर्वरीत अपूर्ण कामासाठी शासन निर्णय डोक्यावरून किंवा हाताने मैला वाहने मेहतरांची नियुक्ती (प्रतिबंध) अधिनियम १९९३ कायदा कलम ४६ अन्वये या शासन निर्णयानुसार या शहरातील भूमीपुत्र या नात्याने होतकरू,गरजू,सुशिक्षित डॉ.वाल्मीकी मेहतर समाजाचे बेरोजगार सध्या मातीकाम करीत आहेत. अशा गरजू युवकांना रोजगार उपलब्ध होईल या दृष्टीने शहरातील सुलभ शौचालयाच्या अपूर्ण कामासाठी पे अँड युज तत्वावर चालविणे या कामासाठी भूमीपुत्र यांना किंवा महर्षि वाल्मीकी युवा विकास मंडळ गांधीनगर औरंगाबाद रजि.क्र.एफ.१२३७९ (औ) यांना नियमानुसार देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (१३)**

**दिनांक २०.०८.२००८ (१९-२९.०७.२००८ ची तहकुब) रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील**

**प्रश्नोत्तरे**

**श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.२० :**

०१. प्रभाग क्र.९ शांतीपुरा या वार्डातील न्यु नंदनवन कॉलनी व भुजबळनगर येथील रोड डांबरीकरण कोणत्या नियमाव्दारे करण्यात आले आहे? सदरील भाग गुंठेवारी अंतर्गत येत असताना महानगरपालिकेने डांबरीकरणाचे काम कसे केले आहे. सदरील वसाहत हि २००१ नंतरची वसाहत आहे.

**अतिरिक्त शहर अभियंता**

**उत्तर :**

प्रभाग क्र.९ शांतीपुरा या वार्डातील न्यु नंदवन कॉलनी व भुजबळनगर हा भाग गुंठेवारी अंतर्गत येत असून पडेगांव कडे मतीमंद शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे बाबत मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाले आहे. सदर भागातून गुंठेवारी अंतर्गत रू.८,७१,८५४/- इतकी रक्कम जमा करून घेण्यात आलेली आहे. सदर काम हे गुंठेवारी विकास योजने अंतर्गत जमा झालेल्या रकमेतून खडीकरण व डांबरीकरणाचे काम रू.२,४२०००/- चा प्रस्ताव मंजुर झाल्यावर सदर कामाची निविदा प्रक्रीया करून संबंधीत ठेकेदारा मार्फत खडीकरण व डांबरीकरण कामे करून घेण्यात आलेली आहेत.

करीता माहितीस्तव सादर.

**प्रश्न क्र.२१ :**

०२. दूधडेअरी ते सेव्हनहिल जोडणारा नियोजीत डिपी. रोड सौजन्यनगर, पंचशीलनगर, बालाजीनगर,विष्णुनगर येथून जाणाऱ्या रोडवर सिंधी कॉलनीतील गुरूव्दाराच्या मालकीच्या जागेवर बांधकाम परवानगी कोणत्या आधारावर दिली आहे? सदरची जागा सुध्दा डिपी.रोड मध्ये जात आहे.

**उत्तर :**

अप्राप्त

**प्रश्न क्र.२२ :**

०३. मालमत्ता कर थकीत असलेल्या किती मालमत्ता सिल केल्या आहेत व संबंधीत मालमत्तेची सद्य परिस्थिती काय आहे.

**वार्ड अधिकारी वार्ड अ**

**उत्तर :**

स.सदस्य श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे यांनी माहे जुलै २००८ च्या सभेसाठी मालमत्ता कर थकीत असलेल्या किती मालमत्ता सिल केलेल्या आहेत व संबंधीत मालमत्तेची सद्य परिस्थिती काय आहे? हा प्रश्न विचारलेला आहे. या अनुषंगाने कळविण्यात येते की, वार्ड अ अंतर्गत मालमत्ता थकीत असलेल्या बहुतांश थकबाकीदारांनी पार्ट पेमेंट केलेला असल्याने संबंधीतांच्या मालमत्ता सिल करण्यात आलेल्या नाहीत.

करीता माहितीस्तव सादर.

**<u>प्रभाग अधिकारी क</u>**

**<u>उत्तर :</u>**

या प्रभागात सिल केलेली मालमत्ताचे कर वसुल केले आहे. तसेच उर्वरित मालमत्ता धारकांना नोटीस देण्याची कार्यवाही चालू आहे.

करीता अहवाल सविनय सादर.

**<u>प्रभाग अधिकारी ड</u>**

**<u>उत्तर :</u>**

वार्ड ड कार्यालयांतर्गत माहे मार्च २००८ अखेर पावेतो एकुण १२२ प्रकरणात मालमत्ता कर थकीत असल्याने जप्तीची कार्यवाही करण्यात येवून मालमत्तांना सिल लावण्यात आली होती, प्रकरणी जप्तीची कार्यवाही केल्यावर मालमत्ता धारकाने तडजोड करून थकीत कराची रक्कम जमा केल्याने सिल उघडण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. करीता माहितीस्तव कळविण्यात येते. ही विनंती.

**<u>प्रभाग अधिकारी इ</u>**

**<u>उत्तर :</u>**

या प्रभागाच्या कार्यक्षेत्रात मालमत्ता कर थकीत असलेल्यापैकी एकही मालमत्ता सील केलेली नाही.

करीता माहितीस्तव कळविण्यात येते.

**<u>वार्ड अधिकारी फ</u>**

**<u>उत्तर :</u>**

महानगरपालिका कार्यालया अंतर्गत येणाऱ्या मालमत्ता धारकांच्या थकीत असलेल्या मिळकती बाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील सोबतच्या प्रपत्रात भरून पाठविण्यात येत आहे.(पान क्र.२२ वर)